...harashtra State Board of
...ondary & Higher Secondary Education,
...e S.R.No.832-A, Final Plot No. 178,179,
...r e-Balbharti, Behind Agharkar
...earch Institute, Bhamburda,
...vajinagar,
...ne-411004.

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व
उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ पुणे
स.न.८३२-ए.प्लॉ.नं.१७८,१७९ ई
बालभारती शेजारी, आघारकर
रिसर्च इन्स्टिट्यूटच्या मागे, भांबुर्डा
शिवाजीनगर, पुणे ४११००४

Tel : Chairman (P) : STD . (020)-25651751 Secretary(P) : 25651750 I EPABX -25705000 Fax : 25665807 I
Email : secretary.stateboard@gmail.com

क्रमांक रा.मं./परीक्षा-८/२९५३
पुणे - ४११ ००४
दिनांक -२०/०५/२०२६

प्रति,

विभागीय सचिव,
महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च
माध्यमिक शिक्षण मंडळ,
सर्व विभागीय मंडळे,

विषय – उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.१२वी) पुरवणी परीक्षा जून–जुलै २०२६ अतिविलंब/विशेष अतिविलंब शुल्काने परीक्षेची आवेदनपत्रे भरण्याच्या तारखांबाबत.

उपरोक्त विषयास अनुसरून आपणास कळविण्यात येते की, जून–जुलै २०२६ मध्ये होणाऱ्या उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.१२वी) पुरवणी परीक्षेस प्रविष्ट होणाऱ्या विद्यार्थ्यांची नियमित व विलंब शुल्कासह परीक्षेची आवेदनपत्रे ऑनलाईन स्विकारण्याची मुदत दि.२०/०५/२०२६ रोजी संपुष्टात येणार आहे.

आवेदनपत्र सादर करण्याची विलंब शुल्काची निर्धारित मुदत संपल्यानंतर अतिविलंब/विशेष अतिविलंब शुल्काने परीक्षेची आवेदनपत्रे स्विकारण्याच्या तारखा व इतर तपशीलवार माहिती खालील प्रमाणे देण्यात येत आहे.

| अतिविलंब शुल्क मुदत (रू.५०/– प्रतिदिनी, प्रतिविद्यार्थी प्रमाणे) | विशेष अतिविलंब शुल्क मुदत (रू.१००/–प्रतिदिनी, प्रतिविद्यार्थी प्रमाणे) |
|---|---|
| गुरूवार दि. २१/०५/२०२६<br>ते<br>शनिवार दि. ३०/०५/२०२६ | रविवार दि. ३१/०५/२०२६<br>ते<br>मंगळवार दि. ०२/०६/२०२६ |

१. सदर आवेदनपत्रे उच्च माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविद्यालयाने ऑनलाईन पद्धतीने www.mahahsscboard.in द्वारे संकेतस्थळावर भरावयाची आहेत. आवेदनपत्रे online भरलेल्या विद्यार्थ्यांचे अतिविलंब/विशेष अतिविलंब शुल्क online चलन तयार करून चलनावर नमुद ICICI बँकेच्या Virtul Acount मध्ये कोणत्याही बँकेद्वारे त्याच दिवशी online पद्धतीने जमा करण्यात यावे. रक्कम जमा केल्यानंतर त्या चलनामधील सर्व विद्यार्थ्यांच्या Application Status मध्ये Send to board व Payment Status मध्ये Paid असा बदल झाला आहे का? याची खातरजमा करावी. असे Status प्राप्त झालेली आवेदनपत्रेच ग्राहय धरण्यात येतील. विभागीय मंडळाने अशी आवेदनपत्रे व चलने स्विकारून व त्याचे Status ची खात्री करून पुढील कार्यवाही करावी. कनिष्ठ

क्र.प्रा.प.

महाविद्यालयाने चलन उशीरा भरल्याचे निदर्शनास आल्यास संबधित विलंबाची यथायोग्य फी संबधित उच्च माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविद्यालयाकडून घेण्यात यावी.

२ त्याचप्रमाणे आवेदनपत्रामध्ये नाव/जन्मतारीख/विषय/माध्यम याबाबत Prilist च्या दुरुस्त्या राहिलेल्या असल्यास प्रचलित पद्धतीने (Offline) विहित शुल्कासह जमा करुन घेणेबाबत उच्चमाध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविद्यालयांना सुचित करण्यात यावे.

३ प्रचलित पद्धतीप्रमाणे विशेष अतिविलंबासह आवेदनपत्रे स्विकारण्याच्या तारखा व सर्व सूचनांचे परिपत्रक संबधित माध्यमिक शाळाप्रमुखांना पाठविण्यात यावे. तसेच पत्रात नमूद केल्याप्रमाणे अतिविलंब/विशेष अतिविलंब शुल्कानुसार आवेदनपत्रे स्विकारावीत. दि. ०९/०६/२०२६ नंतर कोणत्याही विद्यार्थ्यांची आवेदनपत्रे स्विकारू नयेत.

४. मात्र अशा विद्यार्थ्यांना विभागीय मंडळ निश्चित करेल त्याच परीक्षा केंद्रावर परीक्षा द्यावी लागेल. तसेच त्यांचा निकाल इतर विद्यार्थ्यांबरोबर जाहीर होवू शकला नाही तरी विद्यार्थी त्यास हरकत घेऊ शकणार नाही, असे विद्यार्थ्यांकडून हमीपत्र घेण्यात यावे. ही बाब उच्च माध्यमिक शाळा/ कनिष्ठ महाविद्यालयामार्फत विद्यार्थ्यांना सूचित करावी व त्याबाबतची अंमलबजावणी प्राधान्याने करण्यात यावी. कोणताही विद्यार्थी परीक्षेपासून वंचित राहणार नाही याची दक्षता घ्यावी.

Mali

(डॉ. दिपक माळी)
सचिव,
राज्यमंडळ, पुणे ४.

**प्रत माहितीस्तव सादर,**

१ मा. प्रधान सचिव,शालेय शिक्षण व क्रीडा विभाग,मंत्रालय, मुंबई ३२

२ मा. आयुक्त (शिक्षण), शिक्षण आयुक्तालय, पुणे

**प्रत माहितीस्तव व कार्यवाहीसाठी**

१ व्यवस्थापक, गणकयंत्र विभाग, राज्य मंडळ, पुणे–४

२ लेखा शाखा, राज्य मंडळ, पुणे–४

क्र.पु.वि.मं/उमा अ/ 3965
दि.२१.०५.२०२६

प्रति,
प्राचार्य,
सर्व मान्यताप्राप्त शाळा/ कनिष्ठ महाविद्यालये,
जिल्हा- पुणे, अहिल्यानगर,सोलापूर

उपरोक्त राज्य मंडळ प्रकटनाच्या अनुषंगाने जून -जुलै २०२६ उच्च माध्य. परीक्षेकरिता प्रविष्ठ होऊ इच्छिणा-या विद्यार्थ्यांसाठी आवेदनपत्रे अतिविलंब/विशेष अतिविलंबाने भरण्याबाबत कार्यवाही करण्यात यावी. सूचना क्र.१ ते ४ चे अवलोकन करून अचूक कार्यवाही करण्यात यावी. सदर माहिती सर्व मान्यताप्राप्त कनिष्ठ महाविद्यालयांनी आपल्या सूचना फलकावर लावून विद्यार्थी व पालकांच्या निदर्शनास आणून देण्यात यावी.

MBRaut

(डॉ.मीनाक्षी राऊत)
विभागीय सचिव(प्र.),
पुणे विभागीय मंडळ, पुणे-०५

०५